# T12/AGR203/EE/20160303

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) झाडांच्या आतील भागास किडी कोणकोणत्या प्रकारे इजा करतात ते उदाहरणासह लिहा. 5

ब) भौतिक कीड नियंत्रण म्हणजे काय ते लिहून किड नियंत्रणासाठी कोणकोणते भौतिक घटक वापरतात ते स्पष्ट करा. 5

क) घाटेअळीच्या एकात्मिक कीड व्यवस्थापनाबद्दल माहिती द्या. 5

ड) हवेच्या दाबावर चालणारी फवारणी यंत्रांची नावे लिहून कोणत्याही एका यंत्राबद्दल माहिती द्या. 5

इ) किड नियंत्रणासाठी बुरशीच्या महत्त्वाच्या प्रजाती लिहून त्यामुळे नियंत्रित करता येणाऱ्या किडी लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भातावरील प्रमुख किडींची नावे लिहून खोडकिडा या किडीचा नुकसान प्रकार लिहा. 5

ब) सोयाबीनवरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन लिहा. 5

क) लिंबूवर्गीय फळझाडावरील सायला या किडीचा नुकसान प्रकार लिहा. 5

ड) आले या पिकावरील कंदमाशी या किडीचा नुकसान प्रकार व व्यवस्थापन लिहा. 5

इ) झेंडू या पिकावरील प्रमुख किडी लिहून त्यापैकी कोणत्याही एका किडीचे नियंत्रण कसे करावे ते लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) रोगजंतूशिवाय इतर बाबींमुळे होणाऱ्या रोगांचे वर्गीकरण करा. 5

ब) आर्द्रता या घटकाचा पिकाच्या वाढीवर कसा परिणाम होतो ते लिहा. 5

क) जीवाणूंचे गुणधर्म थोडक्यात लिहा. 5

ड) परोपजीवी वनस्पतींचे प्रकार लिहून कोणत्याही एका प्रकाराची माहिती थोडक्यात लिहा. 5

इ) सहजीवी बुरशी याविषयी थोडक्यात माहिती द्या. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) तुरीवरील मर या रोगाची लक्षणे लिहा. 5

ब) उसावरील काणी या रोगाचे व्यवस्थापन लिहा. 5

क) आंब्यावरील करपा किंवा कवडी रोगाची लक्षणे लिहा. 5

ड) बटाटा या पिकावरील उत्तर करपा (लेट ब्लाईट) या रोगाचे व्यवस्थापन लिहा. 5

इ) गुलाबावरील प्रमुख रोगांची नावे लिहून त्यापैकी कोणत्याही एका रोगाची लक्षणे व व्यवस्थापन लिहा. 5